# मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रम साजरा

Feb 28, 2022, 4:49 PM

नाशिक - के. के. वाघ तंत्रनिकेतन, नाशिक च्या वतीने ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त थोर साहित्यिक, कवी वि वा शिरवाडकर तथा कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरवदिन म्हणून साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला के. के. वाघ तंत्रनिकेतन मधील मेकॅनिकल शाखेचे विभागप्रमुख श्री व्ही. एस. कलमानी सर यांनी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी श्री व्ही. एस. कलमानी होते. तसेच ग्रंथपाल आर व्ही गायकवाड, गीतकार सोमनाथ पगार,सौ के.एस मतसागर, सौ ए.पी.दवंडे, श्री बी.व्ही.वैराळ आदी उपस्थित होते.

मराठी भाषा टिकविण्यासाठी या महाराष्ट्रात संतांपासून तर साहित्यिकांपर्यंत अनेकांनी प्रयत्न केले. असून मराठी भाषेचा अभिमान प्रत्येकाने बाळगला पाहिजे. मराठी भाषेला खरा मान सन्मान वि. वा. शिरवाडकर, पु ल देशपांडे, ग दि माडगूळकर, राम गणेश गडकरी, भा. रा. तांबे, प्र. के. अत्रे, अशा अनेक दिग्गजांनी दिला. ज्ञानेश्वरांनी लिहिलेल्या ज्ञानेश्वरीचा परिचय करून देताना ज्ञानेश्वरी वाचनाने आत्मज्ञानाचे सुख लाभते असे प्रा.कलमानी यांनी सांगितले.

कुसुमाग्रजांनी लिहिलेल्या नटसम्राट या नाटकाविषयी बोलताना असा प्रतिभावंत साहित्यिक होणे नाही असे श्री. कलमानी म्हणाले.या प्रसंगी विद्यार्थ्यांनी मराठी कवितेचे वाचन केले व मराठी भाषेवर वक्तृत्व केले.

सदर कार्यक्रमास प्रा. श्री व्ही. एस. कलमानी ,मध्यवर्ती ग्रंथालयाचे ग्रंथपाल श्री. आर. व्ही. गायकवाड, गीतकार सोमनाथ पगार इत्यादी सह विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

